आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२८ डिसेंबर २०२४ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- माजी प्रधानमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात सरकारी इतमामाने अंत्यसंस्कार
- राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, प्रधानमंत्री आणि भूतान नरेश यांच्यासह अनेक मान्यवरांची श्रद्धांजली
- नववर्षाच्या आगमनाच्या पार्श्वभूमीवर अवैध वाहतूक तसंच अवैध मद्यविक्रीवर प्रतिबंध घालण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाची विशेष मोहिम
- बॉर्डर - गावस्कर चषक मालिकेतल्या चौथ्या कसोटी क्रिकेट सामन्यात, भारताच्या नितेश रेड्डीचं पहिलं कसोटी शतक
- उत्तर भारतात थंडीची लाट कायम, राज्यात अनेक ठिकाणी पावसाची हजेरी

**आणि**

- ज्येष्ठ पत्रकार किरण ठाकुर यांचं निधन

**<><><><><>**

माजी प्रधानमंत्री आणि जागतिक ख्यातीचे अर्थतज्ज्ञ डॉ. मनमोहन सिंह यांना आज शोकाकुल वातावरणात भावपूर्ण निरोप देण्यात आला. दिल्लीच्या निगम बोध घाटावर आज त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. शीख धर्मीय संस्कारांनुसार त्यांच्या पार्थिवाला

मुखाग्नी देण्यात आला. यावेळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, लोकसभेचे सभापती ओम बिरला,  भूतान नरेश जिगमे खेसर नामग्येल वांगचुक यांच्या सह अनेक केंद्रीय मंत्री तसेच विरोधी पक्षनेते राहुल गांधी, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, सोनिया गांधी यांच्यासह अनेक नेते, उच्च पदस्थ अधिकारी, काँग्रेस कार्यकर्ते आणि सामान्य नागरिक मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी पुष्पचक्र अर्पण केल्यानंतर सैन्यदलाच्या वतीनं शोकधून वाजवून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी त्यांना गार्ड ऑफ ऑनर म्हणजेच मानवंदना देण्यात आली. ….

मनमोहन सिंग यांच्या शवपेटीवरचा तिरंगा त्यांच्या कुटुंबियांकडे सुपूर्द करण्यात आला. त्यानतर त्यांचे पार्थिव अंत्यसंस्कारासाठी चंदनाच्या चितेवर नेण्यात आलं. यावेळी शीख धर्माच्या प्रथेनुसार  प्रार्थना पठण करण्यात आलं. त्यानंतर त्यांना हवेत बंदुकीच्या फैरी झाडून मानवंदना देण्यात आली. डॉ. मनमोहन सिंह अमर रहे च्या घोषणांनी यावेळी परिसर दुमदुमून गेला होता.

**<><><><><>**

डॉ मनमोहन सिंग यांचं यथोचित स्मारक बांधण्यासाठी सरकार जागा देऊ करणार असल्याचं केंद्रीय गृह मंत्रालयानं म्हटलं आहे. स्मारकासाठी जागा देण्याची विनंती काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांनी काल सरकारकडे

केली होती. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर लगेचच गृहमंत्री अमित शहा यांनी सिंग यांच्या कुटुंबियांशी संवाद साधून त्यांना ही माहिती दिली.

डॉ. मनमोहन सिंह यांचं स्मारक उभारलं जाईल असा निर्णय काल केंद्रीयमंत्रिमंडळानं घेतला असून काँग्रेस पक्षाला ही माहिती देण्यात आली आहे,असं भाजप खासदार आणि प्रवक्ता सुधांशू त्रिवेदी यांनी सांगितलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आकाशवाणीच्या मन की बात कार्यक्रमातून उद्या देशो देशीच्या श्रोत्यांशी संवाद साधणार आहेत. या मासिक कार्यक्रमाचा हा 117वा भाग आहे. आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्या, न्युजऑनएआयआर  ॲप तसंच एअर न्यूज, दूरदर्शन आणि प्रधानमंत्री कार्यालयाच्या युट्युब वाहिनीवरुन हा कार्यक्रम थेट प्रसारित केला जाईल.

**<><><><><>**

कोकणात नवीन वर्षाच्या स्वागताला होणारी पर्यटकांची गर्दी आणि वाहतूक कोंडी टाळण्यासाठी आज आणि उद्या असे दोन दिवस धरमतर पूल ते अलिबाग, अलिबाग ते मांडवा जेट्टी आणि अलिबाग ते रेवदंडा - मुरूड या मार्गावर अवजड वाहनांना वाहतुकीसाठी बंद ठेवला आहे. हे आदेश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी हे आदेश काढले असून यातून जीवनावश्यक वस्तूंची वाहतूक करणाऱी वाहने वगळली आहेत.

**<><><><><>**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात सुरू असलेल्या बॉर्डर गावस्कर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या मेलबर्न इथं सुरू असलेल्या चौथ्या कसोटी क्रिकेट

सामन्यात, तिसऱ्या दिवसअखेर भारतानं आपल्या पहिल्या डावात, ९ बाद ३५८ धावा केल्या आहेत. पहिल्या डावात भारत अजूनही ११६ धावांनी पिछाडीवर आहे.

सामन्याच्या आज तिसऱ्या दिवशी भारतानं कालच्या ५ बाद १६४ धावसख्येवरुन आपला पहिला डाव पुढे सुरू केला. मात्र काल नाबाद असलेले ऋषभ पंत २८ तर रविंद्र जडेजा १७ धावा करून बाद झाले. त्यानंतर नितेश रेड्डी आणि वॉशिंग्टन सुंदर यांनी आठव्या गड्यासाठी १२७ धावांची भागिदारी करत, भारताला फॉलोऑनच्या संकटातून बाहेर काढलं. नितेश रेड्डी यानं आंतरराष्ट्रीय कसोटी कारकिर्दीतलं पहिलं शतक झळकावलं. वॉशिंग्टन सुंदर ५० धावांवर आणि त्यापाठोपाठ जसप्रीत बुमराह शून्यावर बाद झाला.

तिसऱ्या सत्रात आधी अपुऱ्या प्रकाशामुळे आणि त्यानंतर पाऊस पडू लागल्यानं उरलेला खेळ होऊ शकला नाही. दिवसअखेर नितेश रेड्डी १०५ तर मोहम्मद सीराज २ धावा करून खेळपट्टीवर टिकून होते.

**<><><><><>**

किंग्ज कप आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन खुल्या स्पर्धेच्या आज होणाऱ्या उपांत्य फेरीत लक्ष्य सेनची लढत चीनच्या हू झेन ॲन याच्याशी होणार आहे. हा सामना भारतीय प्रमाणवेळेनुसार संध्याकाळी पाच वाजता सुरू होईल.

दरम्यान, काल झालेल्या उपांत्य पूर्व सामन्यात लक्ष्यने हाँगकाँगच्या अन्गुस ना का लोंग याचा १०-२१, २१-१३,२१-१३ असा पराभव केला होता.

<><><><><>

गोंदिया जिल्ह्यात एका माओवाद्यानं पोलीसांसमोर आत्मसमर्पण केलं. देवा सुमडो मुडाम असं त्याचं नाव असून, त्यानं तांडा दलम, मलाजखंड दलम, पामेड प्लाटून या माओवादी संघटनांसाठी काम केलं आहे. त्याच्यावर सरकारनं ७ लाख रुपयांचं बक्षीसही जाहीर केलं होतं.

<><><><><>

देशाच्या उत्तर भागात थंडीची लाट अद्याप कायम आहे. जम्मू-काश्मिर, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड मधे थंडीचा कडाका वाढला असून, काल विविध भागात हिमवृष्टी झाली. मुख्य महामार्गांवर बर्फ साचल्यानं वाहतुकीला अडथळा निर्माण झाला आहे. अनेक ठिकाणी वीजपुरवठा खंडित झाला आहे. रस्त्यांवर बर्फ साचल्यानं अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. पर्यटकांनी सावधगिरी बाळगावी आणि स्थानिक प्रशासनानं दिलेल्या सूचनांचं पालन करावं असं आवाहन करण्यात आलं आहे.

राज्यात काल अनेक ठिकाणी पावसाने हजेरी लावली. जळगाव जिल्ह्यात रावेर, भुसावळ, यावल आणि जळगाव तालुक्यातल्या काही भागांमध्ये सोसाट्याच्या वाऱ्यांसह जोरदार पावसाने हजेरी लावली. नंदुरबार जिल्ह्यात अनेक ठिकाणी पाऊस झाला. धडगाव तालुक्यातल्या काकर्दे इथं अर्धा तास मुसळधार पाऊस झाला.राजधानी मुंबईत तसंच, ठाणे आणि पालघर जिल्ह्यात धुक्याची चादर पसरली असून वातावरणात धूळ आणि धूर जाणवत आहे. हवेत गारवा आहे.

छत्रपती संभाजीनगर शहरात आज सकाळपासूनच ढगाळ वातावरण आहे.

<><><><><>

नववर्षाच्या आगमनाच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या विविध भागात अवैध वाहतूक तसंच अवैध मद्यविक्रीवर प्रतिबंध घालण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत ३१ डिसेंबरपर्यंत विशेष मोहिम राबवण्यात येत आहे. कोणत्याही अनुज्ञप्तीमध्ये विना परवाना मद्यविक्री किंवा अल्पवयीन तरुणांना मद्य उपलब्ध होत असल्यास, राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून कडक कारवाई केली जाणार आहे. तसंच नागरिकांनादेखील काही तक्रारी असल्यास विभागाशी संपर्क करावा, असं आवाहन राज्य उत्पादन शुल्क विभागानं केलं आहे.

बुलढाणा जिल्ह्यातही राज्य उत्पादन शुल्क विभागाची, भरारी पथकं  विविध हातभट्टी ठिकाणं, अवैध मद्यविक्री केंद्रावर छापे टाकून कारवाई करत आहेत.

दरम्यान राज्य उत्पादन शुल्क विभागाने राज्यात अवैध विक्री, मद्यनिर्मीती तसंच वाहतुक प्रकरणी गेल्या १ मार्चपासून आतापर्यंत विशेष मोहीम राबवून २ कोटी २८ लाख ४६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून १ हजार २२९ व्यक्तींवर गुन्हे नोंदवले आहेत.

<><><><><>

नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येला प्रवाशांच्या सोयीसाठी मध्य रेल्वे आणि पश्चिम रेल्वे विशेष रेल्वे गाड्या चालवणार आहे. मध्य रेल्वेवर विशेष रेल्वे गाडी सीएसएमटी स्थानकातून आणि कल्याणहून पहाटे दीड वाजता सुटेल. हार्बर

मार्गावर ही विशेष रेल्वे गाडी सीएसएमटी आणि पनवेल इथून पहाटे दीड वाजता सुटेल. पश्चिम रेल्वेवर देखील चर्चगेट आणि विरार दरम्यान विशेष गाड्या चालवल्या जातील. पहिली ट्रेन चर्चगेटहून पहाटे सव्वा वाजता, दुसरी २ वाजता, तिसरी अडीच वाजता आणि चौथी पहाटे ३ वाजून २५ मिनीटांनी सुटेल. विरारहून पहाटे सव्वा बारा वाजता, त्यानंतर पाऊण वाजता, १ वाजून ४० मिनीटांनी वाजता आणि शेवटची गाडी पहाटे ३ वाजून ५ वाजता सुटेल.

**<><><><><>**

कोकण वगळता आज राज्याच्या इतर भागांमध्ये तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट आणि गारपीट होण्याचाही अंदाज आहे. कोकणात मात्र आज हवामान कोरडं राहील. उद्यापासून उर्वरित राज्यातही हवामान कोरडं राहील.

**<><><><><>**

ज्येष्ठ पत्रकार डॉ. किरण ठाकुर यांचं आज अल्पशा आजारानं निधन झालं. ते ७७ वर्षांचे होते. गेल्या आठवड्यात त्यांना थकवा जाणवल्यानं खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. तिथं आज सकाळी त्यांची प्राणज्योत मालवली. डॉ. ठाकुर तीन दशकांपेक्षा जास्त काळ पत्रकारितेत सक्रीय होते. विविध वृत्तपत्रं, वृत्तसंस्था आणि नियतकालिकांसोबत त्यांनी काम केलं. त्यानंतर त्यांनी अध्यापनाच्या क्षेत्रात प्रवेश केला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संज्ञापन आणि वृत्तपत्रविद्या विभागाचे ते माजी विभागप्रमुख होते. तसंच पुणे श्रमिक पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष म्हणूनही

त्यांनी काम केलं होतं. विद्यापीठातून निवृत्त झाल्यानंतर त्यांनी विविध संस्थांसोबत मानद प्राध्यापक म्हणूनही ते कार्यरत होते. डॉ. ठाकुर यांच्या इच्छेनुसार त्यांचं देहदान करण्यात आलं.

**//<><><><><>//**